ISSN 2394-5303

Special Issue Feb. 2018

International Multilingual Research Journal

Printing Area™

Problems and Prospects of Indian Agriculture



Editor

Dr.R.G.Rasal

Scanned by CamScanner

Printing Area

Editorial Board & Advisory Committee

1) Dr. Vikas Sudam Padalkar (Japan)
2) M.Saleem, Sialkot (Pakistan)
3) Dr. Momin Mujtaba (Saudi Arebia)
4) N.Nagendrakumar (Sri Lanka)
5) Dr. Wankhede Umakant (Maharashtra)
6) Dr. Basantani Vinita (Pune)
7) Dr. Upadhya Bharat (Sangali)
8) Jubraj Khamari (Orissa)
9) Krupa Sophia Livingston (Tamilnadu)
10) Dr. Wagh Anand (Aurangabad)
11) Dr. Ambhore Shankar (Jalna)
12) Dr. Ashish Kumar (Delhi)
13) Prof.Surwade Yogesh (Satara)
14) Dr. Patil Deepak (Dhule)
15) Dr. Singh Rajeshkumar (Lucknow)
16) Tadvi Ajij (Jalgaon)
17) Dr.Patwari Vidya (Jalna)
18) Dr.Varma Anju (Gangatok)
19) Dr.Padwal Promod (Waranasi)
20) Dr.Lokhande Nilendra (Mumbai)
21) Dr.Narendra Pathak (Lucknow)
22) Dr.Bhairulal Yadav (West Bangal)
23) Dr.M.M.Joshi, (Nainital)
24) Dr.Sushma Yadav (Delhi)
25) Dr.Seema Sharma (Indor)
26) Dr. Choudhari N.D. (Kada)
27) Dr. Yallawad Rajkumar (Parli v.)
28) Dr. Yerande V. L.(Nilanga)
29) Dr. Awasthi Sudarshan (Parli v.)
30) Dr Watankar Jayshree
31) Dr. Saini Abhilasha
32) Dr. Prema Chopde (Nagpur)
33) Dr. Vidya Gulbhile (M.S.)
34) Dr. Kewat Ravindra (Chandrapur)
35)Dr. Pandey Piyush (Delhi)
36) Dr. Suresh Babu (Hydarabad)
37) Dr. Patel Brijesh (Gujrat)
38) Dr. Trivedi Sunil (Gujrat)
39) Dr. Sarda Priti (Hydarabad)
40) Dr. Nema Deepak (M.P.)
41) Dr. Shukla Neeraj (U.P.)
42) Dr. Namdev Madumati (M.P.)
43) Dr. Kachare S.V. (Parli-v)
44) Dr. Singh Komal (Lucknow)
45) Dr. Pawar Vijay (Mumbai)
46) Dr. Chaudhari Ramakant (Jalg

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

Note : The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at Beed (Maharashtra

Scanned by CamScanner

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

|| Index ||

01) Food Security in India: Performance, Challenges & Policies
Dr. Ganesh Ramchandra Deshmukh, Kolhar, Dist-Ahmednagar || 09

02) AGRICULTURAL CREDIT MECHANISM THROUGH RURAL CREDIT SYSTEM .....
Mr. Riyazkhan H. Attar, Dr. G.H Barhate, Shrirampur || 14

03) Problems of Indian Agricultural Marketing
Prof. Sahebrao Daulat Nikam, Nashik ||19

04) Agriculture Marketing - Methods and Reforms in India
Prof. Vijay Bhadake, Prof. Ankush Kobarane, Rahuri || 21

05) Role of Agriculture in the Indian Economy
Prof. Vishwanath G.Kotkar, Akole, Dist- Ahmednagar || 24

06) "Financial problems face by farmers in Maharashtra"
Dr. Borde G.D, Prof.V.D.Niramal, Pravaranagar || 27

07) Problems and Prospects of Agricultural Marketing in India
Prof.Ranpise B.D, Prof.Gopale S.D, Pravaranagar. || 29

08) Problem in the Agricultural Marketing
Prof. Sinare Abhay Kondiram, Prof.Chavan Nana Soma, Nashik. || 32

09) IMPORTANCE OF WATER MANAGEMNT IN AGRICULTURE
Prof. Singar J. R., Satral || 34

10) The Problems in Growth of Wine Industries
Rajendra Shankar Shahane || 37

11) Importance and Problems of Agro- Tourism in Maharashtra
Satish Ashinath Gonde, Pravaranagar || 39

12) Modern Agriculture system
Shelke Digambar Sakharam, Pankar Anita Namdeo, Shevgaon || 42

13) Issues Related to Minimum Support Prices
Shinde Vijaykumar Gulabrao, Satral || 45

Scanned by CamScanner

14) PROBLEMS AND PROSPECTS OF AGRICULTURAL MARKETING GOODS
Dr. Ashok Ghorpade, Dr. R. G. Rasal, Pravaranagar. || 49

15) Spatial- temporal study of agricultural work forces in Akole....
Gadekar Deepak Janardhan, Dr. P.H. Mhaske || 53

16) Agricultural Productivity in Ahmednagar District, Maharashtra.
Gulave Santosh Dattatraya, Pravaranagar || 57

17) Agriculture: Backbone of Indian Economy
Aurade Shankar Govind, Naldurg || 61

18) जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय शेती
प्रा. एस.जी.मूंज, प्रा. जी. जी. गायकवाड, गडहिंग्लज || 64

19) भारतीय अर्थव्येवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान
प्रा, डॉ भोसले आर. डी., मनमाड, जि. नाशिक || 66

20) भारतातील कृषी क्षेत्रासाठी विविध पंचवार्षिक योजनेत केलेली सार्वजनिक तरतूद व प्रत्यक्ष खर्च
डॉ. शिवाजी पाते, परभणी || 68

21)''शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे आणि उपाय''
प्रा. डॉ. सुदाम वसंतराव पवार, लातूर || 71

22) नवीन कृषी तंत्रज्ञानाच्या वापराचा कृषी उत्पादन व उत्पन्नावर झालेला परिणाम.....
प्रविण सुरेशराव शिंगणे, डॉ.कल्याणकर पी.एम. || 76

23) भारतातील अन्नसुरक्षा समस्या व उपाय
प्रा.नलिनी विठ्ठल पाचर्णे, औंध, पुणे. || 81

24) कृषीक्षेत्रामध्ये सौरऊर्जेचा वापर : एक अर्थशास्त्रीय अभ्यास
मनेष गंगाराम खटावे, नांदेड || 84

25) भारतीय शेतीमधील विविध पैलूंचा संशोधनात्मक अभ्यास
प्रा.हर्षवर्धन दामोदर जाधव, अमळनेर || 88

26) भारतीय शेती : एक शापित
प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे, नाशिक || 91

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Scanned by CamScanner

27) भारतीय शेतक–यांच्या आत्महत्या
प्रा.डॉ.अजयकुमार मधुकर पालवे ||95

28) "शेतकरी आत्महत्या कारणे आणि उपाययोजना"
प्रा. डॉ. आदिनाथ मोरे, लासलगाव, जि. नाशिक, || 99

29) भारतीय कृषीचा इतिहास आणि अर्थव्यवस्थेतील भुमिका
प्रा.ए.एच.घोंगडे,पाथर्डी जि.अहमदनगर || 102

30) भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका
अंजली पंढरीनाथ लंगोटे, संगमनेर, जि. अहमदनगर || 107

31) भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या – कारणे आणि उपाय
प्रा. महादेव क्षिरसागर, मालेगाव कॅम्प, जि. नाशिक || 109

32) "भारतातील किमान आधारभूत किंमत धोरण : कृषी क्षेत्रातील प्रमुख समस्या"
डॉ. वैद्य संजय गोविंदराव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर. || 112

33) सांगली जिल्ह्यातील कोरडवाहू शेती आणि ताकारी टेंभू उपसा जलसिंचन प्रकल्प.
प्रा.हणमंत एस.सावंत, आटपाडी || 116

34) पिकरचना बदल आणि शाश्वत शेती : विशेष अभ्यास पद्मश्री डॉ.वि. विखे पाटील सहकारी ....
डॉ. जयश्री आर. दिवे, राहाता, जि. अहमदनगर || 119

35) शेतकऱ्यांची कर्जमाफी: एक चिंतन
जयवंत भदाणे व कृषीसेवक मुरलीधर यच्छाव, देवळा, जि.नाशिक || 122

36) प्रा. शिवाजीराव भोसले यांच्या दृष्टीकोणातून गायीचे अर्थशास्त्र .....
प्रा. पाटील मनोज उत्तमराव, प्रवरानगर ||125

37)भारत व पाकिस्तान देशांतरम्यान कृषी व्यापाराबाबत संभाव्य संधी
प्रा.संतोष ज्ञानदेव जाधव, कोळपेवाडी, ता. कोपरगांव || 128

38) शेतमालाचा भाव – सरकारी धोरणे व उपाययोजना
प्रा. एस. व्ही. निळे, प्रवरानगर लोणी. || 131

39) भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या
प्रा. कदू राहूल बापूसाहेब, प्रवरानगर || 135

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Scanned by CamScanner

27

भारतीय शेतक–यांच्या आत्महत्या

प्रा. डॉ. अजयकुमार मधुकर पालवे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी.
जिल्हा.अहमदनगर.

गोषवारा :

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे भारतीय लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती हेच आहे. आजही ग्रामीण लोकसंख्येच्या सुमारे ७५: लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत, परंतु भारतात शेती व्यवसायाचा फारस विकास झालेला नाही. भारतातील बहूतांशी शेती मोसमी पाऊसावर अवलंबून आहे. जलसिंचनाच्या सोयी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. शेती देखील परंपरागत पदधतीने केली जाते. शेती करण्यासाठी लागणारे पुरेशे भांडवल शेतक–यांकडे उपलब्ध नाही. आजही भांडवलासाठी शेतक–यांना सावकारांवर अवलंबून रहावे लागते. शेतक–यांना पुरेशा प्रमाणात भांडवल उपलब्ध व्हावे म्हणून भारतात सहकारी कृषी पतसंस्थांची चळवळ सुरु करण्यात आली. या चळवळीला देखील फारसे यश आलेले दिसून येत नाही. या सर्वांचा प्रतिकूल परिणाम शेतकरी वर्गावर झालेला दिसतो. शेतकरी कर्जातून मुक्त होण्याऐवजी कर्जाच्या जाळयात अडकत चालला आहे. परिणामी कशपी प्रधान अर्थव्यवस्था असलेल्या भारत देशातील शेतकरी आत्महत्याकडे वळलेला दिसून येतो.

प्रस्तावना :

भारतीय शेतक–यांची वाढती आत्महत्या हा एक चिंतेचा आणि संशोधनाचा विषय बनला आहे. भारतातील महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि केरळ राज्यात शेतक–यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वात जास्त

Scanned by CamScanner

असलेले आढळून येते. भारतात आत्महत्यासंबंधी आकडेवारीचा प्रमुख स्त्रोत नॅशनल क्राइम रेकॉर्डस् ब्यूरो (NCRB) असून या मार्फत आत्महत्या संबंधी माहिती प्रसिद्ध केली जाते.

भारतीय शेतक–यांच्या आत्महत्या :

भारतामध्ये शेतकरी आत्महत्याकडे वळलेला दिसतो. खालील तक्त्यामध्ये सन २०१५ मध्ये झालेल्या आत्महत्या दर्शविल्या आहेत.

तक्ता क्रमांक – १

राज्य	एकूण आत्महत्या	शेकडा प्रमाण%
महाराष्ट्र	४२९१	३४%
कर्नाटक	१५६९	१२.५%
तेलंगणा	१४००	११.१%
मध्यप्रदेश	१२९०	१०.२%
छत्तीसगड	९५४	७.६%
आंध्रप्रदेश	९१६	७.३%
तामिळनाडू	६०६	४.८%
इतर राज्य	१५७६	१२.५%
एकूण	१२६०२	१००%

संदर्भ : नॅशनल क्राइम ब्यूरो रेकॉर्डस – २०१५

वरील तक्ता क्रमांक १ मध्ये सन २०१५ मध्ये भारतीय शेतक–यांनी केलेले आत्महत्येचे प्रमाण दर्शविले आहे. सन २०१५ मध्ये एकूण १२६०२ शेतक–यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यामध्ये सर्वात जास्त शेतकरी आत्महत्याचे प्रमाण महाराष्ट्रात असून सन २०१५ मध्ये महाराष्ट्रात ४२९१ ;३४: शेतक–यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. भारतामध्ये महाराष्ट्रानंतर कर्नाटक ;१२.५:, तेलंगणा ;११.१:, मध्यप्रदेश ;१०.२: राज्यातील शेतक–यांनी आत्महत्या केलेल्या दिसून येतात.

तक्ता क्रमांक – २

शेतकरी आत्महत्येत झालेले बदल सन–२०१४ ते २०१५

घटक	वर्षे	
	२०१४	२०१५
शेतकरी	५६५०	८००७
कृषी कामगार	६७१०	४५९५
एकूण	१२३६०	१२६०२

वरील तक्ता क्रमांक २ मध्ये सन २०१४ व सन २०१५ या दोन वर्षातील भारतामध्ये शेतक–यांनी केलेल्या आत्महत्येचे प्रमाण दाखवले आहे. सन २०१४ मध्ये भारतामध्ये एकूण १२३६० शेतक–यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यामध्ये ५६५० शेतक–यांनी आत्महत्या केल्या असून ६७१० शेतकरी मजूरांनी आत्महत्या केल्या आहेत. सन २०१५ मध्ये एकूण १२६०२ शेतक–यांनी आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये ८००७ शेतकरी असून ४५९५ शेतमजूर आहेत. सन २०१४ व २०१५ या दोन वर्षांच्या काळात शेतक–यांच्या आत्महत्येत २ टक्क्यांनी वाढझालेली दिसून येते.

भारतीय शेतक–यांची आत्महत्येची कारणे :

१. कर्ज बाजारीपणा :

भारतीय बहूतांशी शेती मोसमी पाऊसावर अवलंबून आहे. मोसमी पाऊस शाश्वत स्वरुपात नसल्याने शेतीपासून मिळणारे उत्पन्न कमी असल्यो नेहमी कर्जाचा आधार घ्यावा लागतो.यामधून शेतक–यांचा कर्ज बाजारीपणा वाढत जाऊन शेवटी शेतकरी आत्महत्याकडे वळतो.

२. उत्पादन खर्चात वाढ :

अलिकडीन काळात पशूधन कमी झाल्याने रासायनिक खतांचा वापर वाढला आहे. शेती करण्यासाठी यांत्रिक पद्धती वापरली जाते. परिणामी शेतीतील विविध कामासाठी खर्च वाढत चालला असून शेती उत्पादनातील खर्च वाढत आहे.अनेकदा शेतक–यांचा शेती उत्पन्नातून खर्च देखील भागत नाही.

३. शेती क्षेत्राकडे शासनाचे दुर्लक्ष :

भारत हा कृषी प्रधान देश असला तरी कृषी क्षेत्राकडे शासनाचे फारसे लक्ष दिसत नाही. सरकारी अहवालानुसार बँकामार्फत फक्त ५७: कर्जपुरवठा शेतक–यांना केला जातो. त्यामध्ये देखील अडचणी

Scanned by CamScanner

येतात. त्यामुळे शेतक–यांना कर्जासाठी सावकाराची मदत घ्यावी लागते. सावकारांच्या कर्जाचे व्याजदर अधिक असून शेतक–यांना परवडणारे नसते. यामधून कर्ज आणि व्याज दोन्ही वाढत जाऊन शेतकरी आत्महत्येकडे वळतो.

४. नैसर्गिक संकटे :

हवामान खराब असणे, अतिपाऊस, दुष्काळ, वादळे या सारख्या नैसर्गिक संकटामूळे पिकांचे अतोनात नुकसान होते. अशा या नैसर्गिक संकटामूळे शेतक–यांची आर्थिक परिस्थिती खालावते. यामधून शेतकरी मृत्यूला कवटाळतो.

५. जलसिंचनाच्या अपु–या सोयी :

भारतामध्ये आजही सूमारे ६१:

शेती क्षेत्राला जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध नाहीत. फार मोठे शेती क्षेत्राला जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध नसल्याने अशा शेत जमिनीमध्ये वर्षातून एकच पीक घेता येते. वर्षातून एकच पिक घेतल्याने शेतक–यांना उत्पन्न फारशे मिळत नाही. कुटूंबाचा उदरनिर्वाह देखील भागवता येत नसल्याने शेतकरी मृत्यूला जवळ करतो.

६. अनुउत्पादक कारणासाठी कर्जाचा वापर :

शेतक–यांना शेतीमधून मिळणारे उत्पन्न पुरेशे न मिळाल्यामुळे शेतकरी विविध मार्गानी कर्ज मिळवतो. कर्जाचा वापर उत्पादक कारणासाठी करण्याऐवजी शेतकरी हे कर्ज अनुत्पादक ;अन्न–धान्य खरेदी, लग्न, देणी देणेद्ध करतो. यामधून कर्जाची रक्कम वाढत जाऊन अशा कर्जाची परतफेड करणे अवघड होते. शेतकरी कर्जाच्या जाळयात अडकतो व आत्महत्येस प्रवृत्त होतो.

७. कृषी विद्यापीठांचे अपयश :

भारतामध्ये कृषी विकासाला चालना देण्यासाठी अनेक कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत. महाराष्ट्रामध्ये देखील राहूरी, परभणी, अकोला आणि दापोली या ठिकाणी कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत, परंतु अशा कृषी विद्यापीठामध्ये केलेले कृषी संशोधन शेतक–यापर्यंत पोहचत नाही. शोध आणि संशोधनाचा प्रत्यक्ष लाभ शेतक–यांना मिळत नाही परिणामी शेतीमध्ये शेतक–यांचा खर्च अधिक व उत्पादन कमी मिळते. शेती तोटयात जाते. कर्ज व तोटा वाढल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो.

८. किंमतीतील चढ–उतार :

भारतामध्ये शेतमालाच्या किंमतीत नेहमी चढ–उतार झालेले दिसून येतात. हंगामाच्या काळात शेतमालाच्या किंमती कमी होतात तर हंगाम संपल्यानंतर शेतमालाच्या किंमती वाढतात. ज्या शेतक–यांनी शेतीसाठी विविध मार्गांनी कर्ज घेतलेले असते असे शेतकरी कर्ज फेडण्यासाठी हंगामाच्या काळातच कमी किंमतीत शेतमाल विकून टाकतात. वाढीव किंमतीचा फायदा शेतक–यांना मिळत नाही. परिणामी शेती तोटयात जाते.

९. उत्पादनाला संरक्षण नाही :

भारतीय शेतक–यांच्या शेतमाल उत्पादनाला पुरेशा प्रमाणात संरक्षण मिळत नाही. दुष्काळ, अतिवृष्टी, टोळधाड, कीड, हवामान अयोग्य महापूर अशा नैसर्गिक आपत्तीत शेतमालाचे फार नुकसान होते.अशा परिस्थितीत शासकिय पातळीवर पाहिजे तेवढया प्रमाणात सोयी सुविधा संरक्षण मिळत नाही. परिणामी शेतीतून उत्पन्न कमी मिळून कर्जाचे प्रमाण वाढत जाते.

१०. सावकारी कर्जाचा विळखा :

भारतातील शेतक–यांना बँका व इतर वित्त संस्थांकडून पुरेशा प्रमाणात व वेळेवर कर्ज उपलब्ध होत नाही. अशा परिस्थितीत शेतक–यांना सावकारांची मदत घ्यावी लागते. परंतु सावकारांचे कर्जाचे नियम कडक असल्याने यामध्ये शेतक–यांचा छळ, शोषण केले जाते. कर्जाची वसुली बळजबरीने केली जाते. अशावेळी शेतकरी सावकाराच्या छळाला, पिळवणूकीला कंटाळून आपले जीवन संपवतात.

११. आजारपण :

आजारपणात कुठलाही कामधंदा मिळत नाही. आजारपणावरील खर्चात वाढ होत जाते. उत्पन्नाचे कुठलेही साधन नसल्याने आणि आजारपणाच्या वेदना सहन न झाल्याने शेतकरी

१२. सामाजिक रुढी व परंपरा :

सामाजिक रुढी व परंपरा जपण्यासाठी शेतकरी कर्ज काढतात. असे कर्ज साधारणपणे अनुउत्पादक स्वरुपाचे असते. परिणामी कर्जाचे ओझे कालांतराने असाहय होते. त्यामधून शेतकरी आत्महत्याकडे वळतात.

Scanned by CamScanner

१३. कौटूंबिक त्रास :

शेतकरी कुटूंबामध्ये शेतकरी, त्याची मुले, बायको, भाऊ वगैरे मध्ये कोणत्या ना कोणत्या कारणावरुन सतत भांडणे होत असतात. ही भांडणे विकोपाला गेली तर यामधून आत्महत्या सारख्या घटना शेतकरी कुटूंबात घडतात.

१४. चंगळवादी प्रवृत्ती :

अलिकडील काळात चंगळवादी प्रवृत्तीत मोठी वाढझाली आहे. ही प्रवृत्ती वाढीस लागल्यामुळे कर्ज घेण्याचे प्रमाणही वाढले आहे. परंतु असे कर्ज अनुत्पादक स्वरुपाचे असल्याने कर्जाचा डोंगर वाढत जातो. परिणामी शेवटी शेतकरी आत्महत्याकडे वळतो.

१५. इतर कारणे :

भारतीय शेतकरी आत्महत्येची वरील विविध कारणे आहेत. याशिवाय जुगारातील अपयश, व्यसनाधिनता, जागतिकीकरण, भारनियमन, राजकिय लोकांची खोटी आश्वासने, ग्रामीण भागातील छोटया उदयोगांचा –हास वगैरेमुळे भारतीय शेतकरी आत्महत्या करताना दिसून येतात.

शेतकरी आत्महत्येवरील उपाय :

अलिकडील काळात भारतीय शेतक–यांची आत्महत्या हा प्रश्न देशापुरता मर्यादित राहिला नसून तो एक जागतिक समस्या बनला आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. यासाठी वेळीच उपाय योजना करणे गरजेचे आहे. खालील उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास भारतीय शेतक–यांचे आत्महत्येचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

१. शेती संशोधनास चालना देणे.

२. कर्जाचा वापर उत्पादक कारणासाठीच करणे.

३. ग्रामीण भागातील सहकारी कश्पी पतपुरवठा संस्थांना शासकिय पातळीवर बळकटी देणे.

४. शेतक–यांना अल्प दरामध्ये बी–बीयाणे, खते, औजारे कीटक नाशके उपलब्ध करुन देणे.

५. शेती विकासासाठी पूरक अशा व्यवसायाला चालना देणे. उदा. दुग्ध व्यवसाय, शेळी, मेंढी, मत्स्य, कुक्कूट पालनास चालना देणे वगैरे.

६. शेतक–यांना कमी व्याज दराने, वेळेवर आवश्यक तेवढा कर्जपुरवठा करणे.

७. उत्पादन खर्चावर आधारीत कश्पी मालाची किंमत ठरवून शेतक–यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.

८. जलसिंचन सुविधा उपलब्ध करुन बारामाही पिके घेता येतील अशी व्यवस्था निर्माण करणे.

९. शेतक–यांना पिक विमा, अपघात विमा, चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे.

१०. राष्ट्रीय पातळीवर कश्पी धोरण ठरवून त्याच्या माध्यमातून शेतक–यांना कश्पी प्रशिक्षण, अद्यतनिक तंत्राचा वापर, कश्पीतील नवीन शोध, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विक्री व्यवस्था या संबंधी शिक्षण–प्रशिक्षण प्रभावीपणे देणे.

११. नैसर्गिक आपत्तीच्या काळात म्हणजे प्रतिकूल हवामान, दुष्काळ, रोगराई, टोळधाड, महापूर याकाळात शेतक–यांना शासकिय पातळीवर प्रभावी संरक्षण देणे.

वरील सर्व उपाययोजनांची प्रभावीपणे अंमल बजावणी करणे त्याचप्रमाणे केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, समाजसेवी संस्था, शेतकरी संस्था या सर्वांनी एकमेकांस अनुरुप धोरण आखावे. या धोरणास सर्वांगीण यश मिळवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यामुळे भारतीय शेतक–यांच्या उत्पादनात, उत्पन्नात, रोजगार, राहणीमानात वाढ होईल. परिणामी भारतीय शेतक–यांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक जीवनमान उंचावेल.

संदर्भ :

१. प्रा.डॉ.राजेंद्र रसाळ : भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस प्रकाशन, पुणे, आवृत्ती–मे २०१३.

२. प्रा.डॉ.आर.डी.जाधवर/ प्रा.आर.जी. आघाव:भारतीय अर्थव्यवस्था, अथर्व प्रकाशन, पुणे. आवृत्ती–जुलै २०१३.

३. प्रा.डॉ.आर.के.दातीर/ डॉ.सुहास आव्हाड :भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जून–२०१३.

४. डॉ.संभाजी काळे : शेतक–यांची आत्महत्या, वास्तव व उपाय, अथर्व पब्लिकेशन, जळगांव.

५. व्यंकटेश वैष्णव : लोकमत, बळी राजाचा बळी १७ जुलै २०१४.

Scanned by CamScanner